कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/हिंसंवि/२०२४–२५/२४०४
दि. २७/०१/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी "प्रतिभा" या उपक्रमाअंतर्गत मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही संगीत सभा कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न होणार आहे.

दुपारी ठीक ३.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात येईल व तद्‌नंतर संगीत विभागातील विद्यार्थ्यांचा शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यक्रम होईल. त्यामध्ये सुरुवातीला कु. अथर्व गायक यांचे बासरीवादन होईल व त्यानंतर कु. सुरज मळीक हे संवादिनी एकल वादन सादर करतील. संवादिनीवादनानंतर कु. राज्ञी फळदेसाई हिचे शास्त्रीय गायन होईल व तद्‌नंतर तबला सहवादनाच्या कार्यक्रमात कु. सौरव केरकर, कु. कौस्तुभ च्यारी व कु. साहिल माजीक हे विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. तबला वादनानंतर नृत्याचा कार्यक्रम होईल त्यामध्ये कु. उमा नाईक हिचे कथ्थक नृत्य सादर होईल व कार्यक्रमाची सांगता कु. अनुश्री कोळी, कु. मुस्कान खानोलकर, कु. तृप्ती दळवी, कु. मिष्का बेग, कु. रश्मी नावेलकर व कु. स्वरांगी खानोलकर यांच्या भरतनाटयम नृत्याने होणार आहे. सर्व कलाकारांना श्री. गितेश मांद्रेकर, श्री. सुरज मोरजकर, श्री. भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ तसेच श्री. चारुदत्त गांवस व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ संगत लाभणार आहे. तसेच नृत्याच्या कार्यक्रमासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पढंतची साथ, सौ. सपना नाईक यांची नटवंगमची साथ, सौ. दिप्ता रुबसुदंरम् यांची गायन साथ व श्री. चेतनमुर्ती डी. आर यांची मृदंगमची साथसंगत कलाकारांना लाभणार आहे. हा कार्यक्रम सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुला असून मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन हिदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)